दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 28 ■ शुक्रवार, 17 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

**सोने - चांदी भाव**

22k- सोने विक्री :-
1,41,500
+3%GST
24k -सोने विक्री:-
1,54,990.
चांदी :-2550 10gm
**ओंकार ज्वेलर्स**




# आंबा उत्पादकांना भरपाईसाठी नऊ कोटींची गरज

## ■ बदलत्या हवामानामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण
## ■ राज्य सरकारकडे निधीची मागणी करणारा अहवाल सादर होणार

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी यावर्षी मोठ्या संकटात सापडले असून बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका धाराशिव जिल्ह्यातील केशर आंबा बागांना बसला आहे. मोहोर गळती, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ-उतार, फळमाशीचा प्रादुर्भाव, गारपीट व वादळी वाऱ्यामुळे उत्पादनात ८० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक २७ मार्च रोजी कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांकडून जिल्ह्यातील आंबा बागांची पाहणी करण्यात आली होती. त्याचा अहवाल तयार करण्यात आला असून, राज्य सरकारकडे हा अहवाल सादर करून नऊ कोटी रुपयांची मागणी करण्यात येणार आहे.**



| जिल्ह्यातील आंब्याचे एकूण क्षेत्र | - | (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| धाराशिव | - | 680 |
| कळंब | - | 845 |
| तुळजापूर | - | 1352 |
| वाशी | - | 555 |
| परंडा | - | 179 |
| भूम | - | 380 |
| उमरगा | - | 365 |
| लोहारा | - | 150 |

धाराशिव जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी यावर्षी मोठ्या संकटात असून, हवामानातील बदलामुळे धाराशिव जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. चालू वर्षीचा आंबा हंगाम मोहोर गळती, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ उतार, फळमाशीचा प्रादुर्भाव सर्व घटकामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. यावर्षी ऑक्टोबर महिन्यात आंब्याला मोठ्या प्रमाणात मोहर लागला. मात्र मोहोराचे आंब्यात रूपांतर झाले नाही. तसेच आंबा लागल्यावर देखील वाढत्या उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात फळगळ झाली. कृषी विभाग, आंबा संशोधन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठ मधील शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी निवेदन देऊन केली होती. अखेर या निवेदनाची दखल घेऊन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेले छत्रपती संभाजीनगर येथील फळ संशोधन केंद्रातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यातील चार तालुक्यातील केशर आंबा बागांचे दिनांक २७ मार्च रोजी निरीक्षण केले. यावेळी त्यांनी बागांचे निरीक्षण करून आंबा बागांचे झालेले नुकसान, उत्पादनावर पडलेला फरक तसेच वाढत्या उष्णतेमुळे आंब्याच्या बागांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास केला. यावेळी त्यांनी विपरीत हवामानामुळे यावर्षी आंबा उत्पादनात ४० ते ५० टक्के घट झाली असल्याचा निष्कर्ष काढला. त्यानंतर कृषी विभागाने महसूल सहायक आणि तलाठी यांच्यामार्फत आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बागेत जाऊन संयुक्त पंचनामे मागील आठवड्यात पूर्ण केले. धाराशिव जिल्ह्यात केशर आंब्याचे जवळपास ४५०० हेक्टर इतके क्षेत्र आहे. त्यापैकी जवळपास ५०० हेक्टर क्षेत्रावरील बागा या तीन वर्षांच्या आतील म्हणजे उत्पादनक्षम नाहीत. त्या बागा वगळून इतर चार हजार हेक्टर क्षेत्रावरील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार हेक्टरी २२५०० रुपये देण्यासाठी नऊ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यासाठी पंचनामे पूर्ण करून त्याचा अहवाल तयार करण्यात आला असून, तो या आठवड्यात शासनाला सादर करण्यात येणार आहे. शास्त्रज्ञांच्या टिप्पणीसह हा अहवाल कृषी आयुक्तालयाला सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. कृषी विभागाने वेळीच तज्ज्ञ शास्त्रज्ञांकडून आंबा बागांची पाहणी करून अहवाल तयार केल्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजावर पोलिसांचा चाप
## 3 गुन्हे 40 हून अधिक जणांवर कारवाई

**धाराशिव** :-डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान डॉल्बी साऊंड सिस्टीमचा आवाज नियमांपेक्षा अधिक व कर्णकर्कश पद्धतीने लावून प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी धाराशिव शहर पोलिसांनी कडक कारवाई करत ३ स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत. या प्रकरणात ४० हून अधिक जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे पाच ते रात्री दहा या कालावधीत शहरात आंबेडकर जयंतीची मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत काही आयोजक व संबंधितांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन न करता पारंपरिक पद्धतीऐवजी वाहनांवर (टॉप व बस) डॉल्बी डीजे साऊंड सिस्टीम लावून ध्वनी तीव्रतेपेक्षा अधिक आवाजात वाजवली. त्यामुळे परिसरात ध्वनीप्रदूषण झाले. या प्रकाराची दखल घेत धाराशिव शहर पोलिस ठाण्याने संबंधितांवर भारतीय दंड संहिता कलम २२३, २८९, २९२, २९३ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३ व १५ आणि ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० मधील कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हे नोंदवले आहेत.

## पत्नी आणि प्रियकराच्या कटातून पतीचा खून

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे घडलेल्या युवकाच्या खूनप्रकरणाचा तुळजापूर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या प्रकरणात मयताची पत्नी, तिचा प्रियकर आणि आणखी एका साथीदाराला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घटनेमागील धक्कादायक कट उघडकीस आला आहे. मृत व्यक्तीचे नाव कृष्णाथ आनंद साठे (वय ३६) असे असून, त्यांचा मृतदेह तुळजापूर-अक्कलकोट मार्गावरील नटकल पुलाजवळ आढळून आला होता. त्यांच्या डोक्यावर दगडाने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले. घटनेनंतर तुळजापूर पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत संशयितांच्या हालचालींचा बारकाईने मागोवा घेतला. तपासादरम्यान मयताची पत्नी प्रतिभा साठे, तिचा प्रियकर शुभम घाटूळे तसेच पार्थ देशमुख यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पुलाजवळ टाकल्याचे समोर आले आहे. मृतदेह काही अंतर फरफटत नेण्यात आल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.पत्नीच या कटात सहभागी असल्याचे उघड झाल्याने प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले आहे. या गुन्ह्यामागील नेमका हेतू आणि आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास सध्या सुरू आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक रितू खोखर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे व त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# पाच दिवस हरीनामाने दुमदुमला तेरणा काठ
## काल्याच्या कीर्तनानंतर दिंड्या-पालख्या परतीच्या मार्गावर





आरंभ मराठी । तेर

तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित यात्रेची सांगता नृसिंह मंदिरातील काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. गोपाळकाला पार पडल्यानंतर वारकरी, फडकरी तसेच दिंड्या-पालख्या आपल्या गावांकडे परतीच्या मार्गावर निघाल्या. दशमीपासून सुरू झालेल्या या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने भाविक तेर येथे दाखल झाले होते. एकादशीचा उत्सव, नगरप्रदक्षिणा तसेच द्वादशी व त्रयोदशीला संत गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक १६ एप्रिल रोजी नृसिंह मंदिरात पार पडलेल्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता झाली. गेल्या पाच दिवसांपासून तेरणा नदीकाठ हरीनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांच्या टाळ-मृदुंगाच्या गजरात परिसर भक्तिमय झाला होता. काकांच्या वार्षिक समाधी सोहळ्याची यात्रा दोन टप्प्यांत भरते. दशमी ते अमावस्या या कालावधीत सर्वत्र हरीनामाचा जागर होत असतो, तर अमावस्या ते अक्षयतृतीया हा यात्रेचा दुसरा टप्पा मानला जातो. येत्या १९ एप्रिल रोजी अक्षयतृतीया निमित्त पुन्हा भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. यंदाचा यात्रा उत्सव गोरोबाकाका व शिव मंदिर ट्रस्टच्या प्रशासक रूपाली कोरे व तहसीलदार मृणाल जाधव यांच्या नियंत्रणाखाली सुरळीत पार पडला. यात्रेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कळंबचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे, पोलीस उपनिरीक्षक किशोर माळी व ढोकी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. ग्रामपंचायतीच्या वतीने यात्रेकरूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे व सदस्यांनी विशेष प्रयत्न केले. गोपाळकाला निमित्त नृसिंह-लक्ष्मी मंदिरात नृसिंह मूर्तीला उटी चढवून दागदागिने परिधान करून आकर्षक सजावट करण्यात आली होती. या सोहळ्याने भाविकांचे मन मोहून टाकले. काल्याच्या कार्यक्रमानंतर सहभागी झालेल्या दिंड्या व पालख्या भक्तिमय वातावरणात आपापल्या गावी परतल्या.

# धाराशिव भीममय; आदर्श शिंदे यांच्या भीमगीतांनी आसमंत दणाणला





आरंभ मराठी । धाराशिव

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धाराशिव नगरीत उत्साहाची लाट दिसून आली. आदर्श शिंदे यांच्या बुलंद आवाजातील भीमगीतांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. आमदार राणाजगजितसिंह पाटील व जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या प्रेरणेतून, युवा नेते मल्हार पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित भीम महोत्सवाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करून झाली. हजारो भीम अनुयायांनी 'जयभीम'च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमासाठी प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी नगराध्यक्षा नेहाताई काकडे, गटनेते अमित शिंदे, उप नगराध्यक्ष अक्षय ढोबळे, नगरसेवक आकाश तावडे,सिद्धार्थ बनसोडे आदी उपस्थित होते.

आरंभ मराठी | अतिरिक्त पाणी धाराशिवकडे वळविण्यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्णय

# धाराशिवचे भविष्य समृद्ध करणाऱ्या प्रकल्पाला गती

## सविस्तर प्रकल्प अहवालाचे (DPR) काम सुरू करण्याचे आदेश

आरंभ मराठी । धाराशिव

**पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांना दरवर्षी बसणाऱ्या पुराच्या तडाख्यातून मुक्त करून, ते अतिरिक्त पाणी दुष्काळी मराठवाड्याच्या तहानलेल्या जमिनीकडे वळवण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आखलेल्या महत्त्वाकांक्षी योजनेला आता मोठी गती मिळाली आहे. या प्रकल्पाचा 'व्यवहार्यता अहवाल' सकारात्मक आल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार जलसंपदा विभागाने पुढील सहा महिन्यांत 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हा प्रकल्प धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी 'गेमचेंजर' ठरणार असून दुष्काळाचे संकट कायमचे पुसून टाकण्यासाठी हे एक ऐतिहासिक पाऊल ठरणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त आहे.**





### अर्थकारणाला बळ आणि दरडोई उत्पन्नात वाढ

आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या या भागात गुंतवणुकीचे नवे मार्ग खुले होतील. पाणी उपलब्धतेमुळे औद्योगिक विकासालाही गती मिळेल. स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती वाढून त्यातून दरडोई उत्पन्नात वाढ होईल. जागतिक बँकेची तांत्रिक सल्लागार संस्था असलेल्या 'ट्रॅकबेल'ने आपल्या अहवालात हे पाणी वळवणे शक्य असल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास केवळ शेतीलाच पाणी मिळणार नाही, तर भूजल पातळी वाढून टँकरमुक्ती आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. जिल्ह्याच्या अर्थकारणाला गती देणारा हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचा दावा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केला आहे.

कृष्णा खोऱ्यात पावसाळ्यात अतिरिक्त होणारे आणि समुद्राला वाहून जाणारे ५० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी उपसा सिंचन योजनेद्वारे मराठवाड्याकडे वळवण्यात येणार आहे. त्यामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील पूरस्थिती नियंत्रित होऊन मराठवाड्यातील अत्यंत दुष्काळी धाराशिव जिल्ह्याच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. अंदाजे १६ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे साडेआठ लाख एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. मराठवाड्याच्या हक्काच्या २३.६६ टीएमसी पाण्यापैकी उर्वरित १६.६६ टीएमसीपेक्षा अधिक पाणी या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे शेती उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन पिकांचे वैविध्य वाढेल. ऊस, फळबागा आणि भाजीपाला पिकांना पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. हा निर्णय धाराशिव आणि मराठवाड्यासाठी 'गेमचेंजर' ठरणार आहे. त्यामुळे केवळ पाणीटंचाई कमी होणार नाही, तर शेती, उद्योग आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पाला पुढे नेण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिवकरांच्यावतीने धन्यवाद मानले आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बहुजन योद्धा संघटनेच्या वतीने 22 एप्रिलला मिरवणूक

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची उपस्थिती

आरंभ मराठी । धाराशिव

बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या बोधिसत्व, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने येत्या 22 एप्रिल रोजी सायंकाळी धाराशिव शहरात भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून, यंदाच्या मिरवणुकीला मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील उपस्थित राहून उद्घाटन करणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष तथा जयंती समितीचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी दिली. धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, बलराज रणदिवे, मसूद शेख, माजी नगरसेवक खलील सय्यद, नगरसेवक अजहर मुजावर, आयाज शेख, सतीश कदम, रोहित पडवळ, लक्ष्मण माने, पांडू भोसले, अभिजित सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

शिंगाडे पुढे म्हणाले की, बहुजन योद्धा सामाजिक संघटनेमार्फत गेल्या 32 वर्षांपासून धाराशिव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरी केली जाते. महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संघटना सातत्याने करत आहे. मिरवणुकीत महिला, पुरुष आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी होतात. विशेष म्हणजे जयंती उत्सव समितीत सर्व जाती-धर्मातील व्यक्तींचा समावेश असून, पारंपारिक वाद्यांच्या गजरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली जाते. यंदाही रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, रुग्णांना फळवाटप, वृक्षारोपण आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

विविध राज्यांतील पारंपारिक वाद्य पथकांना आमंत्रित करण्यात आले असून, त्यामुळे यंदाची मिरवणूक अधिक वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. तसेच सध्याच्या जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर शांततेचा संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्ध यांच्या देखाव्याचे सादरीकरण हे मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण असणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. 22 एप्रिल रोजी दुपारी 1 वाजता जिजाऊ चौक येथून मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी क्रांती चौक, भीमनगर येथून भव्य मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मिरवणुकीची सांगता होणार आहे. या भव्यदिव्य मिरवणुकीत सर्व जाती-धर्मातील आंबेडकरी विचारांच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन धनंजय शिंगाडे यांनी केले.

# रोटरी क्लबचे १० महिन्यांत ७२ प्रोजेक्ट, हजारो नागरिकांना थेट लाभ

## सामाजिक कार्याचा आलेख उंचावला, धाराशिवकरांकडून कौतुक



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरात रोटरी क्लबने गेल्या १० महिन्यांत सामाजिक कार्याचा नवा आदर्श निर्माण केला आहे. विविध क्षेत्रांमध्ये तब्बल ७२ प्रोजेक्ट पूर्ण करत, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि आपत्ती मदत या सर्वच आघाड्यांवर प्रभावी कामगिरी बजावण्यात आली. या उपक्रमांमुळे हजारो नागरिकांना थेट लाभ झाला असून, रोटरीची सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर यांच्या नेतृत्वाखाली रोटरी टीमने अभूतपूर्व कामगिरी करत रोटरी क्लबचे ३१-३२ डिस्ट्रिक्ट पुरस्कार पटकावले आहेत. रोटरी क्लबच्या माध्यमातून नेत्र रुग्णालयाच्या सहकार्याने आतापर्यंत तब्बल ३५ हजार शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. चालू वर्षात ४५ कॅम्पच्या माध्यमातून सुमारे ४ हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण व गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.




### पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा; ७ लाखांची मदत




महाराष्ट्रात आलेल्या महापुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी रोटरी क्लबने पुढाकार घेत, सुमारे ७ लाख रुपये किमतीचे खते व बियाणे मदत म्हणून वितरित केले. या मदतीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी मिळाली

### महिला कर्करोग तपासणी शिबिर; ८० महिलांचा सहभाग



महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ८० महिलांनी सहभाग घेत तपासणी करून घेतली. वेळेवर निदान आणि उपचारासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला

### रिफ्लेक्टर बसवून अपघात टाळण्याचा प्रयत्न

जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र वाढले असून, त्यामुळे हंगामात ग्रामीण भागात सर्वत्र ऊसाची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र काही उसाच्या वाहनांना अपघात घडण्याचे प्रकार वाढत असल्यामुळे रोटरी क्लब ने पुढाकार घेऊन शेकडो वाहनांना रिफ्लेक्टर बसवले.त्यामुळे ईतर वाहनधारकांना अंधारात ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा अंदाज येऊ लागला.परिणामी अपघात टाळण्यास मदत झाली.

### ‘हॅपी स्कूल’ उपक्रम; शाळेत पाण्याची टाकी बसवली




‘Happy School’ या कार्यक्रमांतर्गत धाराशिव येथील न्यू प्रायमरी स्कूलमध्ये पाण्याची टाकी बसवण्यात आली. विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देत त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### सामाजिक कार्यात संस्थांचा मोठा सहभाग

रोटरी क्लबच्या या उपक्रमांना विविध संस्थांनी मोलाची साथ दिली. निमजाई न्यू ईरा प्रायव्हेट लिमिटेड, बांधकाम कामगार संघटना धाराशिव, फुलाई मल्टीस्टेट, लिफ्ट फॉर अपलिफ्टमेंट, नूतन प्राथमिक विद्या मंदिर, जना स्मॉल फायनान्स बँक, द रियल इस्टेट मॉल पुणे, रोटरी सेवा ट्रस्ट, आयएमए धाराशिव, ओस्ला धाराशिव, श्री दादा रानडे चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, पी. के. मुंडे असोसिएट लिमिटेड आदी संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवत सामाजिक कार्याला बळ दिले.

### १० लाखांचे कृत्रिम अवयव वाटप,जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

अपघातात हात किंवा पाय गमावलेल्या अनेक गरजूंना रोटरी क्लबच्या माध्यमातून जयपूर फूटचे मोफत वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते या कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आले. सुमारे १० लाख रुपये खर्चाचा हा उपक्रम गरजूंसाठी निःशुल्क घेण्यात आला. या उपक्रमाचे जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केले. तसेच अन्य उपक्रमाची माहिती घेऊन रोटरी क्लबच्या कार्याचा गौरव केला.




### ‘नेशन बिल्डर अवॉर्ड’; ५ शिक्षकांचा सन्मान



समाज घडवणाऱ्या आणि विद्यार्थ्यांना दिशा देणाऱ्या शिक्षकांचा ‘Nation Builder Award’ अंतर्गत गौरव करण्यात आला. या उपक्रमात ५ शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

### ‘सेव्ह द प्लॅनेट’ संदेश; मुन्नारमध्ये पर्यावरण जनजागृती




पर्यावरण संतुलनाचा संदेश देत रोटरी सदस्यांनी केरळ राज्यातील मुन्नार येथे जाऊन पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली. निसर्ग संवर्धनाचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

### आरोग्य उपक्रम; श्वानांचे लसीकरण




मानवांमध्ये पसरणाऱ्या रोगांचा धोका कमी करण्यासाठी श्वानांचे लसीकरण करण्यात आले. या उपक्रमामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले

### सेवाभावी संस्थांना आर्थिक बळ

समाजोपयोगी कार्यात सातत्य राखत रोटरी सेवा ट्रस्ट व रोटरी क्लबने अन्नपूर्णा संस्थेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त ५१ हजारांची मदत देत अन्नदान उपक्रमाला बळ दिले, तर भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानलाही ४० हजारांचा हातभार लावला. अन्नपूर्णा संस्थेने दहा वर्षांत लाखो गरजूंना भोजन दिले असून, भटके-विमुक्त प्रतिष्ठान शिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहे. रोटरीच्या या मदतीमुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवण्याच्या प्रयत्नांना अधिक गती मिळणार आहे.

## सलग तीन तास वाचन करून डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**धाराशिव : -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी झाले होते. जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी तीन तास वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अभ्यास केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत झाली.कार्यक्रमात 150 विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यशश्री कदम,शरयू वीर, श्रेया पौळ,कार्तिकी भोसले या विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. आरोही निंबाळकर व अंजली माळी या विद्यार्थिनींनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले.त्यांच्या विचारांचा समाजावर झालेला परिणाम आणि शिक्षणाचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे भाष्य केले.इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी कु. यशश्री सुरज कदम हिने बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित गीतावर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तिच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.तसेच, शाळेतील शिक्षिका श्रीमती इंगळे सुमन,श्रीमती सावळकर महादेवी,श्रीमती नवले जनाबाई,श्रीमती वीर राधाबाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर सविस्तर प्रकाश टाकत त्यांच्या संघर्षमय जीवनाची आणि समाज सुधारण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बशीर तांबोळी यांनी मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक प्रेरणादायी प्रसंग सांगितले. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.कार्यक्रमाचे आयोजन पद्धतीने करण्यात आले असून, सर्वांच्या सहभागामुळे जयंती उत्सव अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दिनेश पेठे यांनी केले तर आभार श्री हनुमंत माने यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री राजेंद्र दीक्षित, श्रीमती मुपडे, अश्विनी भांगे, नेहा भंडारे यांनी परिश्रम घेतले

## १७२ विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप

आरंभ मराठी । धाराशिव

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील शून्य ते १८ वर्ष वयोगटातील बालकांची सर्वंकष आरोग्य तपासणी सुरू असून, या उपक्रमाअंतर्गत ९ मार्च रोजी १७२ विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. आरोग्य तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार विविध नंबरचे चष्मे विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना पुढील उपचारांसाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली.ही मोहीम जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. डी. एस. चाकुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. एस. फुलारी यांच्या सूचनेनुसार तपासणी पथकातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक आरंभ मराठी

### पंचक्रोशीतील नागरिकांनी मांडल्या समस्या

## कोंड येथे पंचायत समिती सभापती गोकर्णा कदम यांचा जनता दरबार

आरंभ मराठी । तेर

आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार धाराशिव तालुक्यातील कोंड येथे पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या जनता दरबारात सभापती कदम यांनी कोंड जिल्हा परिषद गटातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेत त्यावर तत्काळ निवारण करण्याचा प्रयत्न केला. कोंड पंचायत समिती गणातील नितळी, सुंभा व येवती येथील नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या. १५ एप्रिल रोजी झालेल्या या जनता दरबारात पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या घरकुल, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार



हमी योजना, कृषी, बांधकाम विभाग, महावितरण, तहसील, ग्रामपंचायत, पाणीपुरवठा व आरोग्य विभागाशी संबंधित अनेक तक्रारींचे निवारण करण्यात आले. यावेळी नागरिकांकडून आलेल्या काही तक्रारी तात्काळ सोडवता आल्या नाहीत. अशा प्रलंबित तक्रारींची नोंद घेऊन त्यांचे लवकरात लवकर निवारण करण्याचे आश्वासन सभापती गोकर्णा कदम यांनी दिले. या कार्यक्रमास कोंड गटप्रमुख बाळासाहेब खांडेकर, आमदार पाटील यांचे स्वीय सहाय्यक रवीराज चौगुले, पंचायत समिती सदस्य शुभम भोसले, गोपाळ कदम, राहुल जाधव, सुंभा येथील सरपंच गोविंद पाटील, कोंडचे सरपंच-उपसरपंच, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, बूथ प्रमुख, कोंड गावातील प्रमुख कार्यकर्ते तसेच धाराशिव तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी आणि कोंड गटातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सभापती गोकर्णा कदम यांनी कार्यक्रमानंतर कोंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील सुविधांची पाहणी केली व आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## नारंगवाडी शिवारात वीजपुरवठ्याचा बोजवारा; दिवसभर वीजपुरवठा खंडित, शेतकरी संतप्त

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी परिसरात महावितरणच्या भोंगळ आणि ढिसाळ कारभारामुळे शेतकरी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. सांगवे डीपी व पवार डीपी अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना तब्बल २४-२४ तास शेतीसाठी वीजपुरवठा मिळत नसल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात पिकांना वेळेवर पाणी देणे अत्यावश्यक असताना वीजपुरवठा सतत खंडित राहत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. सदर भागात वारंवार वीज गायब होणे, कोणतेही ठोस वेळापत्रक नसणे आणि वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही न होणे, या कारणांमुळे महावितरणच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नारंगवाडी येथील महावितरण कार्यालयाकडूनही शेतकऱ्यांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने संताप आणखी वाढत आहे. एकीकडे शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबवत असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या वीजपुरवठ्यातच अशी अनागोंदी सुरू असल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून वीजपुरवठा सुरळीत करणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

### शेतकऱ्यांनी कसं जगायचं ?

या गंभीर परिस्थितीबाबत प्रतिक्रिया देताना शेतकरी श्रीधर सांगवे यांनी संतप्त शब्दांत म्हटले की, “ इतका कडक उन्हाळा असताना वेळेवर वीज मिळाली नाही, तर आम्ही शेती कशी करायची? पिकांना पाणी कसं द्यायचं? अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचं की मरायचं, असा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे. वीजपुरवठा तत्काळ सुरळीत झाला पाहिजे.

**श्रीधर सांगवे**
शेतकरी.

### अन्यथा आंदोलन करावे लागेल

शेतकऱ्यांना तातडीने नियमित वीजपुरवठा सुरू करण्यात आला नाही, तर नारंगवाडी येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी. ऐन उन्हाळ्यात शेतकरी आणि पशुपालकांना त्रास होत आहे.

**हनुमंत सांगवे**

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कूलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

## पथनाट्यातून आंबेडकरांच्या विचारांचा जागर

### समता सप्ताहात पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण



**आरंभ मराठी । पळसप**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात समतेचा संदेश देणारे प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा उपविद्यापीठ, धाराशिव येथील नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी हे पथनाट्य सादर केले. या नाटिकेतून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे, कार्याचे आणि सामाजिक समतेच्या तत्त्वज्ञानाचे प्रभावी चित्रण करण्यात आले. या कार्यक्रमास समाज कल्याण आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी शिरसाटे, नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. शिंदे, प्राध्यापिका कांबळे, बार्टीचे प्रकल्प अधिकारी तुषार कदम, समतादूत रमेश नरवडे, गोविंद लोमटे, नागेश फुलसुंदर, किरण चिंचोले, गणेश मोटे, सुहास वाघमारे, अर्चना रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले असून, पथनाट्याच्या माध्यमातून समतेचा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## तीन गावांत घरफोड्या; सुमारे सव्वा दोन लाखांचा ऐवज लंपास

**आरंभ मराठी । धाराशिव**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात घरफोड्यांच्या घटना वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले असून, गावसुद, बेगडा परिसरात अज्ञात चोरट्यांनी एका रात्रीत तीन ठिकाणी घरफोड्या करून सुमारे 2 लाख 12 हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून, फिर्यादी आदिनाथ हणुमंत तेरकर (वय 24, रा. गावसुद) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक 15 एप्रिल 2026 रोजी पहाटे 1.30 ते 3.50 वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरासह जीवन डोलारे, वंदना चौरे तसेच बेगडा येथील अनिल देशमुख यांच्या घरात शिरकाव केला. चोरट्यांनी घरातील मोबाईल फोन, रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण 2,12,000 रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 305(अ), 3(5) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी मराठवाडा शिक्षक संघटनेचे जिल्हा परिषदेच्या सीईओंना निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**

आरटीई मधील २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रिया ही समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. मात्र, सध्याच्या प्रवेश प्रक्रियेत काही तांत्रिक बाबींचा गैरफायदा घेतला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आरटीई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलनक करणार असल्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देणार आले आहे. वास्तव्याच्या पुराव्यासाठी आवश्यक असलेल्या 3 किमी अंतराच्या मर्यादेबाबत अनेक साशंकता निर्माण झाल्या आहेत. अनेक ठिकाणी केवळ प्रवेशाच्या उद्देशाने तात्पुरते किंवा केवळ कागदोपत्री भाडेकरार करून नियमावलीचे उल्लंघन केले जात असल्याची दाट शक्यता आहे. अशा प्रकारे निवासाचा पत्ता बदलून दाखवण्याच्या प्रवृत्तीमुळे जे स्थानिक आणि खरोखर गरजू लाभार्थी आहेत, त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्याचप्रमाणे, उत्पन्नाच्या मर्यादेबाबतही अशीच परिस्थिती असून, सादर केलेल्या उत्पन्न प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. उत्पन्नाचे निकष पूर्ण न करणारे पालक चुकीच्या माहितीच्या आधारे लाभ घेत असतील, तर ते या योजनेच्या मूळ हेतूला हरताळ फासणारे आहे. तरी केवळ कागदोपत्री पुराव्यांवर विसंबून न राहता, संशयास्पद वाटणाऱ्या प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून किंवा सखोल चौकशी करूनच प्रवेश निश्चित करावेत. खऱ्या आणि मूळ लाभार्थ्यांना त्यांचा हक्क मिळावा आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडली जावी, मागणी मान्य न झाल्यास मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल, असेही संघटनेचे जिल्हाध्यक्ष जे. एस. शेरखाने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## आशा भोसले यांना सुरेल गायनातून भावपूर्ण श्रद्धांजली



**आरंभ मराठी । धाराशिव**


धाराशिव शहरातील हौशी छंदी गायक कलाविष्कार अकादमीच्या वतीने 'मेलडी स्टार्स' समूहाने पार्श्वगायिका स्व. आशा भोसले यांना त्यांच्या गाजलेल्या गीतांच्या सादरीकरणातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमात मेलडी स्टार्सचे मुख्य प्रवर्तक युवराज नळे, समन्वयक मुकुंद पाटील मेंढेकर, माजी समन्वयक रवींद्र कुलकर्णी, शेषनाथ वाघ, नितीन बनसोडे, प्रसाद धाबेकर, सुशील कुलकर्णी, राजभाऊ कारंडे आणि संजय शिंदे यांनी सहभाग घेतला. उपस्थित कलाकारांनी आशाताईंनी गायलेल्या बहारदार व लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करून वातावरण भारावून टाकले. या सुरेल कार्यक्रमातून कलाकारांनी आपल्या आवडत्या गायिकेप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांना गायनांजली वाहिली.

# उन्हाचा पारा ४० पार.. उष्णतेच्या लाटेने उष्माघाताचा धोका वाढला

## आबालवृद्धांच्या आरोग्याला धोका, काळजी घेण्याचा डॉक्टरांचा सल्ला

**आरंभ मराठी । कळंब**

महाराष्ट्रात सगळीकडेच उन्हाचा पारा वाढला असून सध्याचे तापमान ४० पार गेले आहे. उष्णतेच्या या लाटेने नागरिक चांगलेच हैराण असून, दुपारी १२ च्या नंतर रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा दिला आहे. तापमान असेच उष्ण राहिले तर उष्माघाताचा धोका संभवू शकतो यासाठी नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे आवश्यक बनले आहे. काळजी घेण्यासाठी सनग्लासेस वापरा, डोळे स्वच्छ ठेवा, दिवसातून २-३ वेळा थंड पाण्याने डोळे धुवा. पाणी जास्त प्या, डिहायड्रेशनमुळे डोळे कोरडे पडतात, त्यामुळे पुरेसं पाणी प्या. स्क्रीन टाइम कमी ठेवा, मोबाइल/कॉम्प्युटर वापरताना २०-२०-२० नियम पाळा (दर २० मिनिटांनी २० सेकंद २० फूट दूर बघा). डोळ्यांना थंडावा द्या, काकडीचे तुकडे किंवा गुलाबपाणी लावल्यास डोळ्यांना आराम मिळतो. डोळे चोळू नका, हात स्वच्छ नसतील तर डोळ्यांना इन्फेक्शन होऊ शकतं. योग्य आहार घ्या, व्हिटॅमिन A, C आणि E असलेले पदार्थ (गाजर, पालक, फळे) खा. दिवसभरात किमान ३ ते ४ लिटर पाणी प्या. लिंबूपाणी, ताक, नारळपाणी, कैरीचे पन्हे प्या. तळलेले, मसालेदार जेवण टाळा. काकडी, टरबूज, कलिंगड यांसारखी पाणीदार फळे खा. सकाळी ११ ते संध्याकाळी ४ या वेळेत उन्हात जाणे शक्यतो टाळा. सुती, हलके व फिकट रंगाचे कपडे घाला. डोक्यावर टोपी, छत्री किंवा ओढणी वापरा. खिडक्यांवर पडदे लावा, उष्ण हवा आत येणार नाही याची काळजी घ्या. पंखा, कूलर, AC चा वापर करा



### मुलांमध्ये उष्माघाताची विशेष लक्षणे

मुलांमध्ये उष्माघात वेगाने येतो आणि तो ओळखणे कठीण असते. जास्त रडणे, चिडचिड अशी लक्षणे दिसल्यास थंड खोलीत न्या, पाणी द्या. डोळे खोल जाणे, ओठ कोरडे पडणे अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ डॉक्टरांकडे जावे.

### उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक

सूर्याच्या अतिनील (Ultraviolet) किरणांमुळे डोळ्यांच्या पेशींना इजा होते. सनबर्न सारखीच डोळ्यांची जळजळ होते. दीर्घकाळ UV exposure मुळे मोतीबिंदू (Cataract) लवकर येतो. दृष्टी कमकुवत होण्याचा धोका असतो. उन्हाळ्यात हवा कोरडी असल्याने डोळ्यांतील ओलावा कमी होतो.

**डॉ. अभिजित जाधवर,**
नेत्ररोगतज्ञ.

### उन्हाळ्यात हृदयाला अधिक धोका

उष्णतेमुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. तापमान वाढल्यावर शरीर थंड राहण्यासाठी त्वचेतील रक्तवाहिन्या विस्तारतात. यामुळे हृदयाला जास्त वेगाने व जास्त प्रमाणात रक्त पंप करावे लागते. हृदयाचे ठोके (Heart Rate) वाढतात, हृदयावर अतिरिक्त भार पडतो, आधीच कमकुवत हृदय असल्यास हा भार सहन होत नाही. पाणी कमी झाल्यावर रक्त घट्ट होते. घट्ट रक्तामुळे रक्ताच्या गुठळ्या (Blood Clots) होण्याचा धोका असतो.

**डॉ. सचिन पवार,**
हृदयरोगतज्ञ.

### अशी घ्या उन्हाळ्यात मुलांची काळजी

वाढत्या उन्हाळ्यात लहान मुलांची प्रतिकारशक्ती कमकुवत असल्याने त्यांना उष्णतेचा सर्वाधिक धोका असतो. बालरोग तज्ञांनी पालकांना वेळीच सावध राहण्याचे आवाहन केले असून मुलांसाठी खास मार्गदर्शन केले आहे. स्तनपान करणाऱ्या मातांनी स्वतः जास्त पाणी प्यावे, बाळाला वारंवार स्तनपान द्यावे, बाळाला थेट उन्हात अजिबात नेऊ नये, सुती, सैल कपडे घाला; डायपर जास्त वेळ ठेवू नका, बाळाचे लघवीचे प्रमाण कमी झाल्यास तातडीने डॉक्टरांकडे जा. दर अर्धा तास पाणी पिण्याची सवय लावा, शाळेत पाण्याची बाटली देणे अनिवार्य करा, दुपारी मैदानावर खेळणे टाळा, थंड पाण्याने दिवसातून दोनदा आंघोळ घाला, घरी आल्यावर लगेच थंड पाणी न देता सावलीत बसवा.

**डॉ. रमेश जाधवर,**
बालरोग तज्ञ.

## उमरगा येथे डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूलमध्ये दंत तपासणी शिबिर; १८० विद्यार्थ्यांची तपासणी

**आरंभ मराठी । उमरगा**



राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत येथील डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूलमध्ये दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन जिल्हा कार्यक्रम प्रमुख डॉ. धनंजय चाकूरकर (जिल्हा शल्य चिकित्सक, धाराशिव) तसेच डॉ. कोमल गरड (वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय उमरगा) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिरात उपजिल्हा रुग्णालयातील दंत शल्य चिकित्सक डॉ. स्वप्नाली लामतुरे यांनी प्रमुख भूमिका बजावली. त्यांना शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, उमरगा येथील प्रा. शाहबाज शेख तसेच अंकिता सु., संस्कृती करपे, वैष्णवी क्षीरसागर, अनुष्का साळुंके, गणेश आंधळे आणि अथर्व केदार या टीम सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिरादरम्यान एकूण १८० विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना दातांची स्वच्छता राखणे, योग्य पद्धतीने ब्रश करण्याची सवय लावणे तसेच दंत आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका गंगा अंबर तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून (श.प) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**आरंभ मराठी । धाराशिव**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरात राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाच्यावतीने विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. शहरातील प्रमुख चौक, स्मारके तसेच सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महामानवांच्या विचारांचा वारसा जपत समता, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांना अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजात समानतेची भावना रुजवण्यासाठी तसेच संविधानिक मूल्यांचे पालन करण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास नगरसेवक तथा गटनेते खलिफा कुरेशी, नगरसेवक अयाज (बबलू) शेख, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सुनील आंबेकर, नगरसेवक सर्फराज कुरेशी, नगरसेवक इस्माईल शेख, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश तांबारे, जयंतराव देशमुख, नरसिंह मेटकरी, ॲड. योगेश सोने पाटील, ॲड. अविनाश जाधव, रवी ठेंगल, सुरज वडवले, सचिन अंधारे, शुभम सुकाळेसह कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सभापती गोकर्णा कदम यांच्याकडून कोंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी

**आरंभ मराठी । तेर**



प्राथमिक आरोग्य केंद्र कोंड येथे बुधवारी (दि.१५) धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांनी भेट देऊन सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत विविध विभागांना भेट देत स्वच्छता, औषधांचा साठा तसेच उपलब्ध आरोग्य सुविधांची माहिती घेतली. आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांबाबतही त्यांनी माहिती जाणून घेतली. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अडचणी, रिक्त पदे याबाबत चर्चा करून संबंधित प्रश्न वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून सोडविण्याचे आश्वासन दिले. या पाहणीदरम्यान कोंड गटप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब खांडेकर, गोपाळ कदम व रविराज चौगुले उपस्थित होते.

## औद्योगिक वसाहतीतील थकीत करप्रश्नी तामलवाडी येथे संताप; आंदोलनाचा इशारा

**आरंभ मराठी । तामलवाडी**



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ग्रामपंचायत हद्दीतील औद्योगिक वसाहतीमधील थकीत कर वसुलीचा प्रश्न चिघळला असून, भाजपचे कार्यकर्ते तथा माजी सैनिक शिवाजी रामकृष्ण सावंत यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. औद्योगिक तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांना कर वसुलीच्या नोटिसा बजावूनही मागील तीन वर्षांपासून जप्तीची कारवाई करण्यात प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा गंभीर आरोप सावंत यांनी केला आहे. पंचायत समिती तुळजापूर येथील गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही वसुली प्रक्रिया पुढे सरकलेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात सावंत यांनी महाराष्ट्र राज्य शासनाचे मुख्य सचिव, छत्रपती संभाजीनगर येथील आयुक्त, धाराशिव जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद धाराशिव यांसह विविध अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी सादर केल्या आहेत. ग्रामपंचायत अधिनियम १९५९/१९६० च्या कलम १२९ नुसार जप्तीची कारवाई करून थकीत कर वसुली करावी, अशी त्यांची मागणी आहे. यापूर्वी सात वेळा आंदोलने आणि ३५ ते ४० वेळा लेखी पाठपुरावा करूनही प्रशासनाने ठोस पावले उचलली नसल्याचा आरोप त्यांनी केला. ८ एप्रिल २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा होऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने, आता तातडीने जप्ती करून कर वसुली न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सावंत यांनी दिला आहे.

आरंभ मराठी

### नगराध्यक्षांच्या आश्वासनानंतर लाक्षणिक उपोषण मागे

## सकल नाभिक समाजाचे लाक्षणिक उपोषण; अतिक्रमण हटविण्याची मागणी

**आरंभ मराठी । तुळजापूर**



तुळजापूर येथील वेताळ नगर भागात प्रस्तावित श्री संत सेना महाराज सांस्कृतिक सभागृहाच्या जागेवर वाढलेल्या अतिक्रमणाच्या विरोधात सकल नाभिक समाज तुळजापूर यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या मागणीसंदर्भात नगरपालिका व संबंधित प्रशासनाला वेळोवेळी निवेदन सादर करूनही ठोस कारवाई होत नसल्याने समाजबांधवांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. नाभिक समाज तुळजापूर परिसरात दीर्घकाळापासून सेवाकार्य करत असून समाजाचे आराध्य संत श्री सेना महाराज यांची पुण्यतिथी दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथे समाजासाठी सांस्कृतिक सभागृह व्हावे, यासाठी मागील सुमारे ४० वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या पुढाकारातून आमदार राणाजगजितसिंह यांच्या माध्यमातून सभागृहासाठी २५ लाखांचा निधी उपलब्ध झाला असून बांधकामालाही सुरुवात झाली आहे. मात्र, नियोजित जागेवर शेजारील काही नागरिकांनी अनेक वर्षांपासून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मूळ आराखड्यानुसार बांधकामास अडथळा निर्माण होत असल्याने ते अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे, ही प्रमुख मागणी करण्यात आली. या लाक्षणिक उपोषणास शहरातील सर्व नाभिक बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एक दिवस सलून दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला. मोठ्या संख्येने व्यावसायिक आणि समाजबांधव आंदोलनात सहभागी झाले होते.

### तत्काळ कारवाई करून अतिक्रमण हटवले जाईल - नगराध्यक्ष विनोद गंगणे

शहरातील नियोजीत जागेवरील दोन दिवसांत पोलीस संरक्षणात अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येणार असून संबंधितांना नोटिसा देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनाही तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उपोषणस्थळी नगराध्यक्ष विनोद गंगणे, नगरसेवक औदुंबर कदम, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, विशाल रोचकरी, किशोर साठे, रत्नदीप भोसले, दिनेश क्षीरसागर, पंडितराव जगदाळे, अमर हंगरगेकर, सागर कदम, अनंत सावंत, नरेश अमृतराव, आनंद कंदले, राजेश्वर कदम, श्री गवळी आदींसह नगरपालिका अतिक्रमण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्यांनी समाजबांधवांशी संवाद साधत उपोषण मागे घेण्याची विनंती केली. नगराध्यक्षांच्या आश्वासनानंतर समाजाच्या वतीने लाक्षणिक उपोषण मागे घेण्यात आले.

# पारा ४१ अंशावर, तापमानामुळे जनजीवन विस्कळीत विजेचा लपंडाव व अपुऱ्या सुविधांनी त्रास वाढला





आरंभ मराठी । भूम

१० एप्रिलपासून आकाशात सूर्य आग ओकत असून नागरिकांना उन्हाच्या तीव्र चटक्याचा सामना करावा लागत आहे. उन्हाच्या झळांनी शहरासह ग्रामीण भागातील दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. तापमानाचा पारा ४१ अंशांवर पोहोचल्याने उष्णतेची तीव्रता अधिकच वाढली आहे. भूम तालुक्यात सर्वाधिक उन्हाची तीव्रता भूम शहरात जाणवत आहे. खडकाळ जमिनीवर वाढलेली वस्ती, दिवसभर तापणारे खडक आणि त्यातून रात्री बाहेर पडणारी उष्णता यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तालुक्याचे मुख्य ठिकाण असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय कामांसाठी शहरात यावे लागते; मात्र बहुतांश नागरिक सकाळी ११ वाजेपर्यंत कामे आटोपून गावाकडे परतताना दिसत आहेत. भूम शहरात सकाळी ११ ते सायंकाळी पाच या वेळेत रस्ते ओस पडलेले दिसतात. रस्त्यावर नागरिकांची वर्दळ तसेच वाहनांची वाहतूक कमी झाली आहे. बाजारपेठेत दुकाने उघडी असली तरी ग्राहक नसल्याने अनेक ठिकाणी शांतता दिसून येते. शासकीय कार्यालयांमध्येही कर्मचारी वगळता नागरिकांची उपस्थिती अत्यल्प आहे. भूम तालुक्यात रब्बी पिकांच्या कामांची लगबग सुरू असतानाच उन्हाचा कहर वाढल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. सध्या ज्वारी, कांदा, बाजरी आदी पिकांची काढणी सुरू असून शेतकरी सकाळ व सायंकाळच्या वेळेतच उर्वरित कामे पूर्ण करत आहेत. नागरिकांसह पशुधनालाही उष्णतेचा मोठा फटका बसत असल्याचे चित्र आहे.

## आठवडी बाजार सायंकाळीच गजबजू लागला

भूम तालुक्यातील भूम, वालवड, ईट व पाथरूड येथे आठवडी बाजार मोठ्या प्रमाणावर भरतो. या बाजारांसाठी १५ ते २० गावांतील नागरिक येत असतात. पूर्वी सकाळपासून सुरू होणारा बाजार आता सायंकाळी भरू लागला आहे. भूम येथे नगरपरिषदेच्या वतीने व्यापाऱ्यांसाठी शेड उभारण्यात आले असले तरी उकाडा कायम असल्याने व्यापाऱ्यांना सकाळीच दुकाने लावावी लागत आहेत. दिवसभर ग्राहकांची वर्दळ कमी असते, तर सायंकाळी पाचच्या सुमारास ऊन कमी झाल्यावर बाजारात गर्दी वाढते. दोन ते तीन तासांतच बाजार आटोपत असून व्यापाऱ्यांना दुकाने बंद करावी लागत आहेत. ईट व वालवड येथील बाजारांमध्ये वृक्षलागवडीमुळे काही प्रमाणात सावली मिळत असली तरी ती अपुरी पडत आहे.

## बस स्थानकावर अपुरा निवारा; प्रवासी त्रस्त

भूम आगाराच्या बस स्थानकात अपुरा निवारा असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. शेडची उंची कमी असल्यामुळे उन्हाची तीव्रता अधिक जाणवते. पिण्याच्या पाण्याची तसेच पुरेशा सावलीची सोय नसल्याने प्रवाशांना इतरत्र आश्रय घ्यावा लागत आहे.

## रात्री तीव्र उकाडा; डासांचा त्रास आणि विजेचा लपंडाव

भूम शहरासह तालुक्यात रात्री उकाड्याचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांना पंखे, कूलर आदी विद्युत उपकरणांचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना उकाड्याचा त्रास अधिक सहन करावा लागत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर गटारे व नाल्यांमधून डासांचा उपद्रव वाढत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य लढ्याला दिला सामाजिक आशय

## प्रा. राजा जगताप यांचे प्रतिपादन



आरंभ मराठी । धाराशिव

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी आयोजित विशेष व्याख्यानात मराठी विभाग प्रमुख प्रा. राजा जगताप यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला सामाजिक आशय देण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असे प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले की, बाबासाहेबांच्या मते राष्ट्राचा खरा नायक म्हणजे माणूस असून राष्ट्र म्हणजे माणसा-माणसातील संबंध होय. हे संबंध समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित असावेत. भारतीय समाजातील स्त्री व दलित घटक पूर्वीपासून उपेक्षित होते. डॉ. आंबेडकर यांच्या प्रयत्नातून संविधानाच्या माध्यमातून सर्व जातीतील स्त्रियांना समान स्तरावर येण्याची संधी मिळाली. स्त्रियांच्या हक्कांसाठी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर असे एकूण ४२ कायदे करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार मिळवून दिले. पुरुषसत्ताक व्यवस्थेतून स्त्रियांना मुक्त करण्याचे कार्य त्यांनी कायद्याच्या माध्यमातून केले, असेही प्रा. जगताप यांनी नमूद केले. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणूनही बाबासाहेबांची ओळख अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, कोकणातील खोत पद्धतीविरुद्ध त्यांनी लढा देत शेतकऱ्यांवरील अन्याय थांबवला. जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून “पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असून त्यावर प्रत्येकाचा समान अधिकार आहे” हा विचार त्यांनी मांडला. अतिरिक्त पाणी ही समस्या नसून संपत्ती आहे, त्याचा योग्य विनियोग व्हावा, असा त्यांचा आग्रह होता. या कार्यक्रमास प्रा. सचिन चव्हाण, प्रा. बबन सुर्यवंशी, प्रा. माधव उगिले, डॉ. केशव क्षीरसागर, सुमेर कांबळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विवेकानंद चव्हाण यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. बालाजी गुंड यांनी मानले.

# सामाजिक समता सप्ताहानिमित्त जात वैधता प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

## विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

आरंभ मराठी । पळसप

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धाराशिव यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. १४ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत हा उपक्रम सुरू असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यावर या मोहिमेचा मुख्य भर राहणार आहे. अनेक विद्यार्थ्यांची जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याने त्यांना पुढील प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेदरम्यान विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्था, महाविद्यालये तसेच जिल्हास्तरीय यंत्रणा समन्वयाने कार्यरत राहणार आहेत. विद्यार्थ्यांचे अर्ज जलद गतीने स्वीकारून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यात येणार असून, प्रक्रियेला गती देण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन मिळावे यासाठी विविध महाविद्यालयांमध्ये ‘समता मंच’ केंद्रांच्या माध्यमातून विशेष शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची माहिती, अर्ज प्रक्रिया तसेच पडताळणीची संपूर्ण माहिती दिली जाणार आहे. समाजातील वंचित व मागासवर्गीय घटकांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करून ते तात्काळ पडताळणी समितीकडे सादर करण्यावर भर देण्यात येणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध होऊ शकणार आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थी तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज तातडीने सादर करून या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नारी सन्मान एकता यात्रेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; धाराशिवमध्ये भव्य पदयात्रा संपन्न




आरंभ मराठी । धाराशिव

'नारीशक्ती वंदन' विधेयकाच्या समर्थनार्थ भाजपा महिला मोर्चा धाराशिव यांच्या वतीने 'नारी सन्मान एकता यात्रा' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाली. या पदयात्रेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा आयोजित करण्यात आली होती.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पदयात्रेला सुरुवात झाली. 'सशक्त नारी, सशक्त भारत' आणि 'नारीशक्ती वंदन, मोदीजींचे अभिनंदन' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. नारीशक्ती वंदन अधिनियमाच्या पार्श्वभूमीवर महिलांना संसद व राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळणार असून, हा निर्णय महिलांच्या सशक्तीकरणाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. या निर्णयामुळे महिलांच्या नेतृत्व विकासाला चालना मिळून निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढणार असून समाज अधिक समतोल व सक्षम होण्यास मदत होणार आहे. या पदयात्रेत महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिती कदम, धाराशिव नगराध्यक्षा नेहा काकडे, पंचायत समिती सभापती गोकर्णा कदम, शहराध्यक्षा वंदना डोके यांच्यासह येडेश्वरी महिला बचत गट, लक्ष्मीबाई महिला व बालविकास मंडळ, ज्ञानदा सुशिक्षित बेरोजगार बहुउद्देशीय सामाजिक संस्था, तुलशी महिला सहकारी पतसंस्था, एच.आय.व्ही. आरोग्य रक्तदान सेवाभावी संस्था, दुर्गा ब्युटी पार्लर, मोती आरीवर्क, अन्नपूर्णा व आनंदी मुलींचे वस्तीगृह, मथुरा नाष्टा सेंटर, स्वआधार दुग्ध उद्योग तसेच विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

# राष्ट्रीय महामार्ग 65 वरील पुलाला भगदाड

## आमदार प्रवीण स्वामी यांच्याकडून पाहणी, दुरुस्तीचे आदेश



आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील येणेगुर येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील पुलाला भगदाड पडल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या संदर्भात नागरिकांनी आमदार प्रवीण स्वामी यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानुसार बुधवार (दि.१५) रोजी सायंकाळी आमदार प्रवीण स्वामी यांनी संबंधित पुलाची प्रत्यक्ष पाहणी केली. पुलावरील भगदाडामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून अपघाताचा धोका वाढला आहे. यावेळी आमदार स्वामी यांनी नॅशनल हायवे प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक कासार यांच्याशी संपर्क साधून तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश दिले. तसेच महामार्गावरील अपूर्ण कामे, सर्विस रोड तसेच राज्य मार्गाला जोडणारे रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पोस्ट ऑफिस मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**धाराशिव** :-भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त धाराशिव येथील पोस्ट ऑफिस मुख्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी धाराशिव विभागाचे डाक अधीक्षक प्रशांत मालकर, प्रमुख पाहुणे समाजभूषण पुरस्कारप्राप्त विजय गायकवाड, तसेच पोस्ट मास्टर गोवर्धन साहेब यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रशांत मालकर यांनी आपल्या मनोगतात डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या “शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” या संदेशाचे महत्त्व अधोरेखित करत त्याचे सविस्तर विवेचन केले. प्रमुख पाहुणे विजय गायकवाड यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत महाड येथील चवदार तळे सत्याग्रह, मानगाव परिषद तसेच भारतीय संविधान निर्मितीतील त्यांच्या योगदानाची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात पोस्ट मास्टर गोवर्धन साहेब यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनात पुस्तकांचे असलेले महत्त्व विशद केले. तसेच दीपक केंगार यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल जाधव यांनी केले, तर प्रास्ताविक स्वप्नील बनसोडे यांनी मांडले. कार्यक्रमाचे नियोजन अमोल ढाकरे, विश्वजीत ढावारे, गणेश गुरव आणि मरगणे साहेब यांनी केले. कार्यक्रमास पोस्ट ऑफिस मुख्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेवटी अमोल ढाकरे यांनी आभार प्रदर्शन केले.

दैनिक आरंभ मराठी

## बालविवाह आढळल्यास तत्काळ गुन्हा दाखल होणार

# अक्षय तृतीयेला बालविवाहावर राहणार लक्ष

आरंभ मराठी । धाराशिव



समाजातील बालकांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच त्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी बालविवाह रोखणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट करत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी नागरिकांना बालविवाह न करण्याचा इशारा दिला आहे. १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय तृतीया निमित्त कुठेही बालविवाह आढळल्यास तात्काळ गुन्हा नोंदविण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ तसेच महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २०२२ संपूर्ण राज्यात लागू असून या कायद्यानुसार बालविवाह करणे किंवा आयोजित करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. केंद्र शासनाच्या ‘बाल विवाह मुक्त भारत’ अभियानांतर्गत बालविवाह रोखण्यासाठी विविध पातळ्यांवर व्यापक प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने ग्रामसेवकांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले असून ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका आणि शहरी भागात पर्यवेक्षिका यांची सहाय्यक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अक्षय तृतीया हा शुभ मुहूर्त मानला जात असल्यामुळे या दिवशी सामूहिक व वैयक्तिक विवाह मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने पोलीस विभाग, बाल संरक्षण समिती आणि संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. १९ एप्रिल रोजी संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी सर्व यंत्रणांच्या समन्वयाने प्रभावी कारवाई करण्यात येणार असून जनजागृतीवरही विशेष भर देण्यात येत आहे. ‘1098’ या चाइल्ड हेल्पलाईन क्रमांकाचा व्यापक प्रचार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही सजग नागरिकाने बालविवाहाची माहिती मिळताच तात्काळ हस्तक्षेप करून तो रोखावा आणि संबंधित माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धाराशिव यांच्याकडे सादर करावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बालविवाह आढळल्यास संबंधित पालक, पुजारी/काझी, मंडप मालक, हॉल चालक, स्वयंपाकी, वाजंत्री, आयोजक तसेच उपस्थित नातेवाईकांवरही कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, अशी हमीही प्रशासनाने दिली आहे.

# नारंगवाडी येथे संत गोरोबाकाका पुण्यतिथीनिमित्त महाप्रसाद व भजन-कीर्तन

आरंभ मराठी । नारंगवाडी



वारकरी संप्रदायातील वैराग्य, भक्ती आणि साधेपणाचा आदर्श मानले जाणारे संतकवी संत गोरा कुंभार यांच्या पुण्यतिथीनिमित्त उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाप्रसाद व भजन-कीर्तनाचा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गेल्या तब्बल ७७ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या परंपरेनुसार गोरोबा सुरवसे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. सायंकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यंदाही या धार्मिक कार्यक्रमाला परिसरातील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. गावातील मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात सर्वांनी पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला. या निमित्ताने रात्रभर भजनाचा कार्यक्रम रंगला. भजनी मंडळाने सादर केलेल्या अभंग आणि गवळणींमुळे संपूर्ण परिसर विठ्ठलनामात दंग झाला होता. या संपूर्ण कार्यक्रमासाठी प्रेमनाथ सुरवसे, नितीन सुरवसे, लहू भोसले, अंकुश भोसले, सुनीता सूर्यवंशी, मिराबाई सुरवसे, जिजाबाई सूर्यवंशी, अलका सुरवसे आणि पल्लवी सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. पुरुष, महिला, लहान-मोठे अशा सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला आणि संत परंपरेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

आरंभ मराठी

नांदुरीत शाळेचा सांस्कृतिक जल्लोष; स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे रंगतदार सादरीकरण

–

धाराशिव; तुळजापूर तालुक्यातील नांदुरी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन

कार

अध

सर

नान

गाडे

उपा




सीएसआर अंतर्गत बालाजी अमाईन्सकडून तामलवाडी शाळेला रंगकाम

आरंभ मराठी / तामलवाडी

बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर ( कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी ) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील

त्साहात

बोलकी

